# हस्तलिखितांचे डिजिटायझेशन

## विद्यापीठातील खर्डेकर नॉलेज अँण्ड रिसर्च सेंटरचा उपक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर नॉलेज अँण्ड रिसर्च सेंटरमध्ये दुर्मिळ हस्तलिखितांच्या डिजिटायझेशनचे काम सुरू आहे. येथे सुमारे १० हजार दुर्मिळ हस्तलिखिते असून, ५० हजारांहून अधिक दुर्मिळ पुस्तके आहेत. या सर्वांचे संवर्धन करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. संवर्धन केल्यावर सेंटरच्या पोर्टलवर हे ज्ञानभांडार सर्वांसाठी उपलब्ध करून दिले जाणार आहे.

आपल्याला ज्ञात झालेल्या गोष्टी हस्तलिखितांद्वारे जतन करून ठेवण्याची परंपरा शतकानुशतके सुरू होती. मुद्रित माध्यमे आल्यावर छपाई सुरू झाली, मात्र या आधीचे सर्व ज्ञान, माहिती ही हस्तलिखितांत आढळते. शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर



नॉलेज अँण्ड रिसर्च सेंटरमध्ये अशी सुमारे १० हजार दुर्मिळ हस्तलिखिते आहेत.

तसेच, काही नियतकालिकांचे दुर्मिळ अंकही आहेत. मान्यवर लेखकांची, समाज सुधारकांनी लिहिलेली पुस्तकेही येथे आहेत. या पुस्तकांचे पुनर्मुद्रणही बंद झाले आहे. ही सर्व पुस्तके, हस्तलिखिते विद्यापीठाकडे लोकांनी विश्वासाने दिली आहेत. त्याचे जतन करण्याच्या दृष्टीने डिजिटायझेशन सुरू केले आहे. या सर्वांचे जतन करण्यासाठी येथे



**कोल्हापूर : ज्ञानेश्वरीचे दुर्मिळ हस्तलिखित.**

स्वतंत्र अर्काइव्ह विभाग आहे. येथे ही हस्तलिखिते, पुस्तके सुरक्षित ठेवली आहेत. वातावरणातील बदलांचा हस्तलिखितांवर परिमाण होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जातात. यामुळे ही हस्तलिखिते सुरक्षित आहेत. ही हस्तलिखिते सेंटरच्या पोर्टलवर पाहायला मिळतील. कॉन्झर्व्हेशनिस्ट शफिक देसाई, टेक्निकल असिस्टंट फॉर मॅन्युस्क्रिप्ट डिजिटायझेशन योगेश ठाकरे यांच्यासह तेथील कर्मचारी डिजिटायझेशनचे काम करीत आहेत.

### नियतकालिके

हरिजन, हंटर, अखंड भारत, विविधज्ञान विस्तार (मध्य प्रदेश), दीनबंधू यांचे जुने अंकही येथे आहेत. तसेच जुनी नाणी, ताम्रपटही येथे आहेत.

**डिजिटायझेशनमुळे हस्तलिखितांचे जतन होईल. मात्र, एवढे पुरेसे नाही, या हस्तलिखितांचे मराठीत भाषांतर करून ते सर्व वाचकांना उपलब्ध करून देणे हा मूळ उद्देश आहे. लवकरच याच्या भाषांतराच्या कामालाही सुरवात होईल. पुढील दोन वर्षांत हा उपक्रम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.**

**- नमिता खोत**, संचालक,
बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर नॉलेज अँण्ड रिसर्च सेंटर

### दुर्मिळ हस्तलिखिते

- बोपदेवकृत शतश्लोकी (शके १७३९, सन १८१७)
- गणेशमाहात्म्य (शके १७१३, सन १७९१)
- ज्ञानेश्वरी (शके १४९०, सन १५६८)
- तोडरमलकृत आयुर्वेद सौख्य परिभाषा (शके १७४१, सन १८९१)

21 APR 2021

**तरुण भारत**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# न्यू कॉलेजचे यंदाही खेळात वर्चस्व

## अव्वल स्थान पटकावत क्रीडा महर्षी श्री मेघनाथ नागेशकर ट्रॉफीवर सलग पाचव्यांदा शिक्कामोर्तब

प्रतिनिधी
कोल्हापूर

न्यू कॉलेजचा यंदाही खेळात 'डंका'..! निमित्त आहे क्रीडा महर्षी श्री मेघनाथ नागेशकर ट्रॉफीचे. सलग पाचव्यांदा या मानाच्या क्रीडा ट्रॉफी शिक्कामोर्तब करून कॉलेजने क्रीडा क्षेत्रात अव्वल कामगिरी करून निर्विवाद वर्चस्व कायम राखले आहे. कॉलेजला मिळालेल्या क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल खेळाडूंचे क्रीडाप्रेमी व शौकीनातून कौतुक होत आहे.

न्यू कॉलेजने २०१९-२० सालची क्रीडा महर्षी श्री मेघनाथ नागेशकर ट्रॉफीवर आपले नाव कोरले आहे. असे जाहीर झाल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासनाने संस्थेला दिली आहे. यावर्षीची ट्रॉफी पटकावून न्यू कॉलेजने सलग पाचव्यांदा ट्रॉफी पटकाविण्याचा क्रीडा क्षेत्रात एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.



**कोल्हापूर : सलग पाचव्यांदा पटकविलेली मेघनाथ नागेशकर ट्रॉफी.**

यंदाच्या वर्षी न्यू कॉलेजच्या ३६ खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारात सर्वोत्तम कामगिरी केली. या कामगिरीच्या जोरावर गेल्या चार वर्षांच्या तुलनेत डबलपेक्षा अधिक गुणांची कमाई करण्यात यश मिळाले. यंदाच्या वर्षी सर्वाधिक ७७८ गुणांची कमाई करून निर्विवाद वर्चस्व राखले आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

यशस्वी खेळाडूंना संस्थेचे चेअरमन के.जी.पाटील, प्राचार्य व्ही.एम.पाटील, जिमखानाप्रमुख अमर सासने, सुरज झिटे, यांचे मार्गदर्शन लाभले.

- **३६ खेळाडूंनी बजावली आपआपल्या क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी**
- **गेल्या चार वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक ७७८ गुणांची कमाई**

### सलग पाच वर्षात ट्रॉफीवर कब्जा

क्रीडा क्षेत्रात विद्यापीठ स्तरावर सर्वोत्कृष्ठ कामगिरी करत सलग पाचव्यांदा निर्विवाद वर्चस्व राखत ट्रॉफीवर कब्जा केला आहे. यापूर्वी कॉलेजने चार वेळा ट्रॉफी पटकविली असून यामध्ये २०१५-१६, १७, १८, १९ या वर्षांचा समावेश असून यंदाची २०१९-२० सालची ट्रॉफीसह सलग पाचव्यांदा अव्वल स्थान मिळवत निर्विवाद वर्चस्व राखले आहे.